## निशाणी १३२ खालील आदेश

१. वादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे सदर दावा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित ठेवण्याची (sine die) विनंती केली आहे. सदर अर्जावर प्रतिवादीने म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शवला आहे. अर्ज व त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. तसेच दोन्ही विधीज्ञांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

२. वादीतर्फे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला, की सहकारी अपीलीय न्यायालयाने पुनर्विलोकन अर्ज क्र. ३९/२०१८ मध्ये दिनांक १२.१२.२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदर दावा sine die ठेवण्यात आला होता. विभागीय सहनिबंधक यांनी आदेश पारित केला असला तरी त्या आदेशाविरुद्ध वादीने मा. मंत्री, सहकार यांचेकडे पुनर्विलोकन अर्ज दाखल केला असून तो अद्याप प्रलंबित असल्यामुळे सदर वाद पुन्हा sine die ठेवण्यात यावा.

३. याउलट प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला, की विभागीय सहनिबंधकांनी अंतिम आदेश पारित केलेला आहे, मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका निकाली काढलेली आहे, तसेच मा. मंत्री यांनी कोणतीही स्थगिती दिलेली नाही. केवळ पुनर्विलोकन अर्ज प्रलंबित असल्याच्या कारणावरून न्यायालयीन कार्यवाही अनिश्चित काळासाठी स्थगित ठेवता येणार नाही, करिता अर्ज नामंजूर करावा.

४. अर्ज, त्यावरील म्हणणे तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सहकारी अपीलीय न्यायालयाने पुनर्विलोकन अर्ज क्र.३९/२०१८ मध्ये परिच्छेद क्र.१५ मध्ये रिट याचिका व विभागीय सहनिबंधक यांच्या निर्णयापर्यंत वाद sine die ठेवणे उचित राहील, असे निरीक्षण नोंदविले आहे. तथापि, त्या आदेशाच्या operative भागात न्यायालयाला वाद sine die ठेवण्याचा कोणताही स्पष्ट किंवा बंधनकारक निर्देश दिलेला नाही. उलट, operative भागामध्ये पक्षकारांना खालच्या न्यायालयासमोर हजर राहण्याचे निर्देश देऊन खालच्या न्यायालयाने कायद्यानुसार पुढील कार्यवाही करावी, असे स्पष्ट नमूद करण्यात आलेले आहे. त्यामुळे परिच्छेदातील निरीक्षणास operative आदेशाचा दर्जा प्राप्त होत नाही.

५. हे देखील निर्विवाद आहे की, पूर्व पिठासिन अधिकारी यांनी त्यावेळच्या परिस्थितीचा विचार करून विभागीय सहनिबंधक तसेच मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयापर्यंत दावा sine die ठेवलेला होता. तथापि, त्यानंतर विभागीय सहनिबंधक यांनी दिनांक २२.०४.२०१९ रोजी अपील निकाली काढून अंतिम आदेश पारित केलेला आहे. तसेच त्या आदेशासंदर्भातील मा. उच्च न्यायालयातील रिट याचिकादेखील दिनांक १२.०१.२०२६ रोजी infructuous म्हणून निकाली निघालेली आहे. त्यामुळे ज्या कारणास्तव दावा sine die ठेवण्यात आला होता, ती कारणे आता अस्तित्वात राहिलेली नाहीत.

६. अर्जदाराने विभागीय सहनिबंधक यांच्या आदेशाविरुद्ध सुमारे तीन वर्षांच्या विलंबाने मा. मंत्री, सहकार यांचेकडे पुनर्विलोकन अर्ज दाखल केलेला असल्याचे अभिलेखावरून दिसून येते. मात्र, त्या पुनर्विलोकन अर्जामध्ये सदर न्यायालयाच्या कार्यवाहीस स्थगिती देणारा कोणताही अंतरिम आदेश मा. मंत्री यांनी पारित केलेला नाही. केवळ पुनर्विलोकन अर्ज प्रलंबित असल्याच्या कारणावरून न्यायालयीन कार्यवाही आपोआप स्थगित होत नाही. सक्षम प्राधिकरणाकडून स्पष्ट स्थगिती आदेश प्राप्त झाल्याशिवाय न्यायालयास वाद अनिश्चित काळासाठी sine die ठेवण्याचे कोणतेही कायदेशीर कारण दिसून येत नाही.

७. याशिवाय, दावा sine die ठेवणे ही अपवादात्मक प्रक्रिया असून, ती केवळ अपरिहार्य परिस्थितीतच अवलंबिली जाते. या प्रकरणात दावा दीर्घकाळ प्रलंबित असून, विभागीय सहनिबंधकांचा निर्णय झालेला आहे, मा. उच्च न्यायालयातील कार्यवाही संपुष्टात आलेली आहे आणि मा. मंत्री यांचेकडून कोणतीही स्थगिती नसताना वाद पुन्हा sine die ठेवणे न्यायोचित अथवा कायदेशीर ठरणार नाही.

८. अर्थात, भविष्यात मा. मंत्री यांनी सदर प्रकरणासंदर्भात कोणताही अंतरिम स्थगिती आदेश किंवा या न्यायालयाच्या कार्यवाहीवर परिणाम करणारा आदेश पारित केल्यास, संबंधित पक्षकारांना तो आदेश अभिलेखावर आणून कायद्यानुसार योग्य तो अर्ज करण्याची संधी उपलब्ध आहे. करिता, सर्व बाबींचा विचार करता, अर्ज मंजूर होण्यास पात्र नसल्याचे दिसून येते. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज निशाणी १३२ नामंजूर करण्यात येतो.

२. पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

३. पक्षकारांनी दावा लवकरात लवकर निकाली काढणेकामी योग्य ती कायदेशीर पूर्तता करावी.

(सदर आदेश खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

स्वाक्षरीत/–

दिनांक १८.०७.२०२६

(मनिषा ना. थोरात)
न्यायाधीश, सहकार न्यायालय,
औरंगाबाद.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are word to word same as per original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Smt. S.S. Shingade |
| Court | : Co operative Court, Aurangabad |
| Judgment/Order Signed by P.O. On | : 18.07.2026 |
| Judgment/Order uploaded on | : 18.07.2026 |